# बृहन्मुंबई महानगरपालिका

बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय व टो. रा. वैद्यकीय महाविद्यालय

डॉ. ए.एल.नायर रोड, मुंबई सेंट्रल, मुंबई 400 008

क्र. टीएनटी/879 दि.17.11.2021

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयांच्या आस्थापनेवरील रु.57,700 – 1,82,400 (M10) अधिक नेहमीचे भत्ते या वेतनश्रेणीतील अतिविशेषकृत विषयातील सहाय्यक प्राध्यापक, गट-अ या संवर्गातील 14 विषयांची एकूण 36 रिक्त पदे महानगरपालिका वैद्यकीय कर्मचारी निवड समितीमार्फत सरळसेवेने भरण्याकरिता जाहिरातीत नमूद करण्यात आलेल्या विहित अटींची पूर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांकडून दि.18.11.2021 पासून दि.04.12.2021 पर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रत्येक पदासाठी पृथक अर्ज करणे आवश्यक आहे.

रिक्त पदांची सविस्तर माहिती

**(अ) वैद्यकीय अतिविशेष विभाग**

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय</th><th>रिक्त पदे</th><th rowspan="16">महाराष्ट्र अधिनियम 2004 चा क्रमांक 8, नियम क्र. 3 (1) क अन्वये पारित केलेल्या क्रमांक बीसीसी-2001 / 1897/ प्रक्र 64 / 2001 / 16 दिनांक-10.02.2004 नुसार अ.क्र. 1 ते 14 वरील शाखा अतिविशेष स्वरूपाच्या असल्यामुळे मागासवर्गाचे आरक्षण लागू नाही.</th></tr>
<tr><td>1</td><td>मज्जातंतूशास्त्र</td><td>1</td></tr>
<tr><td>2</td><td>आंतरासर्गशास्त्र</td><td>3</td></tr>
<tr><td>3</td><td>जठरांत्रिकचिकित्साशास्त्र</td><td>1</td></tr>
<tr><td>4</td><td>चिकित्सालयीन औषधशास्त्र</td><td>1</td></tr>
<tr><td>5</td><td>बालरोगशल्यचिकित्साशास्त्र</td><td>3</td></tr>
<tr><td>6</td><td>उरोशल्यचिकित्साशास्त्र</td><td>3</td></tr>
<tr><td>7</td><td>रूधिराभिसरणशास्त्र</td><td>2</td></tr>
<tr><td>8</td><td>मेडीकल आन्कोलॉजी</td><td>5</td></tr>
<tr><td>9</td><td>मूत्रपिंडरोपणशास्त्र</td><td>3</td></tr>
<tr><td>10</td><td>नवजात अर्भकशास्त्र</td><td>3</td></tr>
<tr><td>11</td><td>सर्जिकल आन्कोलॉजी</td><td>1</td></tr>
<tr><td>12</td><td>ह्दयरोगशास्त्र</td><td>5</td></tr>
<tr><td>13</td><td>सुध्यटनशल्यचिकित्साशास्त्र</td><td>2</td></tr>
<tr><td>14</td><td>मुत्रशल्य चिकित्साशास्त्र</td><td>3</td></tr>
<tr><td colspan="2">एकूण</td><td>36</td></tr>
</table>

उपरोल्लेखित रिक्त पदांमध्ये काही अनअनुसूचित रिक्त पदे आहेत. सदर अनअनुसूचित पदांना पदसातत्य मिळण्याबाबतची कार्यवाही चालू आहे. तथापि, सदर पदसातत्यास मंजूरी न मिळाल्यास त्या पदांवर निवड झालेल्या अध्यापकांची सेवा खंडीत करण्याचे अधिकार महानगरपालिकेस राहतील.

वर नमूद केलेल्या पदसंख्येत बदल होण्याची शक्यता आहे. रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबत तसेच सामाजिक / समांतर आरक्षण बदलण्याचे अधिकार किंवा भरती प्रक्रिया अंशत:/पूर्णत: रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांना राहतील. याबाबत कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.

वेतनश्रेणी – सहाय्यक प्राध्यापक: रु.57,700 – 1,82,400 (M10) अधिक नेहमीचे भत्ते

पात्रता:-

**1) वयोमर्यादा –**

i) उमेदवाराचे वय अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास 04.12.2021 रोजी

★ खुल्या प्रवर्गासाठी 38 वर्षे
★ मागास प्रवर्गासाठी 43 वर्षे
★ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचा-यांसाठी उच्च वयोमर्यादा लागू नाही.
★ उच्च गुणवत्ताधारक तसेच प्रदिर्घ अनुभव असलेल्या उमेदवारांच्या बाबत वयोमर्यादा शिथिल करण्याचा विचार करण्यात येईल.
★ माजी सैनिक यांच्या बाबतीत शासन निर्णय क्र.आरटीए-1088/1192/सीआर-32/89/16-अ दि.28 मे 1992 च्या अनुषंगाने वयोमर्यादेत सवलत राहील.

ii) अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवाराच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी समितीकडून विचार करण्यात येईल, परंतु समितीच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवाराच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतांच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वर्यामर्यादेच्या सवलतीकरिता विचारात घेतले जातील. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरीय रुग्णालयामध्ये बंधपत्रित सेवापूर्ण केलेल्या उमेदवारांना प्राधान्य देता येईल. अनुभवाच्या संदर्भात ज्या पदांवरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरिष्ठ पदांवरील अनुभव वयोमर्यादा शिथिल करण्यास्तव विचारात घेतला जाईल.

**2) शैक्षणिक अर्हता-**

(i) **वैद्यकीय** :- उमेदवाराने भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने वैद्यकीय संस्थामधील शिक्षकांसाठी तयार केलेल्या अद्ययावत न्यूनतम शैक्षणिक अर्हता नियमावली 1998 मधील अनुसूची 1 मध्ये नमूद केल्यानुसार तसेच 8 जुन 2017 व 12 फेब्रुवारी 2020 पर्यंत अद्ययावत केलेल्या वैद्यकीय विशेष आणि वैद्यकीय अतिविशेष या विषयांकरिता नमूद केलेल्या पदव्या / पदव्युत्तर पदव्या धारण केलेल्या असाव्यात.

किंवा

उमेदवाराने भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने वैद्यकीय संस्थामधील शिक्षकांसाठी तयार केलेल्या अद्ययावत न्यूनतम शैक्षणिक अर्हता नियमावली 1998 मधील अनुसूची दोन मध्ये विहीत केलेल्या तत्सम तसेच 8 जुन 2017 व 12 फेब्रुवारी 2020 पर्यंत अद्ययावत केलेल्या शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या असाव्यात.

**3) मराठी भाषा विषयक आवश्यकता-**

i) परिपत्रक क्र. एमपीएम/2/7984 दिनांक 20.06.2016 नुसार उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा 50 गुणांचा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.

ii) ``उमेदवार प्रथम नियुक्तीच्या वेळी उपरोक्त मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण नसल्यास त्या उमेदवाराची नियुक्ती 2 वर्षासाठी मराठी भाषा उत्तीर्ण होण्यासापेक्ष तात्पुरत्या स्वरूपाची असेल.'' उमेदवाराने 2 वर्षाच्या आत मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण न केल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

**4) संगणक विषयक आवश्यकता-**

i) परिपत्रक क्र. एमपीएम/2/6211 दिनांक 18 फेब्रुवारी 2009 (महानगरपालिका ठराव क्र.160 दि.5 मे 2008) अन्वये उमेदवाराने संगणक अर्हता, सेवेत प्रवेश केल्यापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

ii) सहाय्यक प्राध्यापक या पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवारांना संगणकाचे ज्ञान नियमानुसार अवगत करणे आवश्यक आहे. त्याने / तिने डीओईएसीसी सोसायटीचे `सी.सी.सी.' किंवा `ओ' स्तर किंवा `ए' स्तर किंवा `बी' स्तर किंवा `सी' स्तर प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेली असणे आवश्यक आहे किंवा उमेदवाराने महाराष्ट्र राज्य व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांची `एम.एस.सी.आय.टी.' किंवा 'जी.ई.सी.टी.' ही परीक्षा उत्तीर्ण केलेली असणे आवश्यक आहे किंवा नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीत उपरोक्त संगणक अर्हता प्राप्त करणे आवश्यक आहे अन्यथा त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

प्रस्तृत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी पेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव यांच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि/अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी महानगरपालिकेच्या www.mcgm.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील.

**5.** जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना अपात्र ठरविण्यात येईल.

**6. अर्जाचे शुल्क:**

मागासवर्गीय उमेदवारांसाठी रुपये 315/- वस्तु व सेवाकरांसहित आणि खुल्या गटासाठी रुपये 525/- वस्तु व सेवाकरांसहित.

**7. अर्ज करण्याची पध्दत आणि याबाबतच्या सूचना -**

i) प्रस्तृत रिक्त पदांसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

ii) अर्हतापात्र उमेदवारांनी वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज "http://formonline.net/nair_hospital/" या वेबसाईटद्वारे दि.18/11/2021 ते दि.04/12/2021 या कालावधीत सादर करणे आवश्यक राहिल.

iii) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केल्यानंतर अर्जाचे शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

iv) सहाय्यक प्राध्यापक या पदासाठी ऑनलाईन अर्ज दि.18.11.2021 ते दि.04.12.2021 पर्यंत सादर करावयाचे असून दि.04.12.2021 नंतर अर्जाचे शुल्क स्विकारले जाणार नाही आणि अर्जासाठी भरलेल्या शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**8. पदाची कर्तव्ये व जबाबदारी -**

भारतीय वैद्यक परिष्देच्या निकषानुसार विभागप्रमुख / खातेप्रमुख (अधिष्ठाता) यांनी शैक्षणिक, अध्यापन, संशोधन, वैद्यकीय व विविध प्रकारचे नेमून दिलेले कामकाज आणि चिकित्सालयीन /चिकित्सेतर व संबंधित अन्य कामे करणे.

**9. सर्वसाधारण अटी -**

प्रस्तृत पदांच्या सर्वसाधारण अटी व शर्ती याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

9.1) रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील. रिक्त पदानुसार गुणवत्ता यादीतून उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड करण्यात येईल. तथापि निवड यादी कोणत्याही वेळी पूर्व सूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत. जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या व अनुशेष बदलण्यासापेक्ष आहेत.

9.2) अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या एखादया कर्मचा-याला अर्ज करावयाचा असेल तर त्याने / तिने त्याच्या / तिच्या खातेप्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

9.3) उमेदवारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे की ते आवेदीत पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहीत अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी व कुठल्याही टप्प्यावर निर्दशनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्र व्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

9.4) उमेदवारांनी शाळा सोडल्याचा दाखला, जन्म दाखला, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे, माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्याबाबतची गुणपत्रिका, यांच्या साक्षांकीत छायांकित प्रती वैयक्तिक ऑनलाईन अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. विवाहीत महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहीत महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करू शकतात. पदवी व पदव्युतर परीक्षा एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण केली असल्यास ती परीक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र, पदवी प्रमाणपत्र महाविद्यालय आणि अतिविशेषकृत पदवी भारतीय औषधवैधक परिषदेतून मान्यताप्राप्त असल्याचे महाविद्यालयाकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

9.5) उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थितीत रहावे लागेल. उमेदवाराने मुलाखतीच्या वेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्यावेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी. मुलाखतीच्या वेळी मूळ प्रमाणपत्रासहित सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतींचा एक साक्षांकित संच सोबत असणे आवश्यक आहे.

9.6) उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' ऑनलाईन अर्जासोबत जोडावे.

9.7) उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरूपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो नियुक्तीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराने पोलिस स्टेशनकडून चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने संबंधित पोलिस स्टेशनकडून ''ना हरकत प्रमाणपत्र'' सादर करणे अनिवार्य आहे.

9.8) निवड झालेले उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबधित पोलिस ठाण्याकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

9.9) **उ**मेदवार यापूर्वीच महानगरपालिका सेवेत नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना संबंधीत पदावर नियुक्ती करण्यापूर्वी 1 महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम सुरक्षा अनामत म्हणून भरावी लागेल किंवा तशा अर्थाचे (आशयाचे) जामीनपत्र सादर करावे लागेल. सदर भरलेली सुरक्षा अनामत रक्कम भरुनसुध्दा महानगरपलिकेमध्ये नेमणूक न स्विकारल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधीत नोकरी सोडल्यास किंवा काही कारणास्तव बडतर्फ केल्यास त्यांनी भरलेल्या अनामत रक्कमेचा त्यांना परतावा मिळण्याचा हक्क राहणार नाही. महानगरपालिका सेवेत कार्यरत असल्यास अनामत रक्कम भरणे आवश्यक नाही.

9.10) निवड झालेल्या उमेदवाराची नियुक्ती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही वैद्यकीय महाविद्यालयात/ रूग्णालयात करण्यात येईल व त्याची महानगरपालिकेतील कोणत्याही वैद्यकीय महाविद्यालयात/ रूग्णालयात आवश्यकतेनुसार बदली करण्यात येईल.

9.11) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निर्दशनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

9.12) निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती नंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम, 1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम, 1999 वेळोवेळी होणा-या सुधारणेनुसार लागू होतील.

9.13) उमेदवार महानगरपालिकेच्या सेवेत दि. 05.05.2008 पासून कार्यरत असल्यास निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती नंतर नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू होईल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजेच मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम 1953 आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

9.14) निवड झालेल्या उमेदवाराची नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल व तीन वर्षानंतरचे सेवासातत्य, परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

9.15) प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.

9.16) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महापालिकेचे सेवानिवासस्थान उपलब्ध करून देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही.

9.17) निवड समितीने तयार केलेली निवडसूची एक वर्षासाठी किंवा नविन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यंत किंवा दोन्हीपैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय ठरेल त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

9.18) सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील रिक्त पदे भरण्याचे कार्यालयीन कामकाज टो.रा.वैद्यकीय महाविद्यालयामार्फत पाहिले जाते. संपर्कासाठी दुरध्वनी क्र. 022-23023115

**<u>विशेष सूचनाः</u>-**

★ यापूर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेलेअर्ज विचारात घेतेले जाणार नाहीत . तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

★ जर एखादया उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

★ मध्यस्थ / ठक / मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती, यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध रहावे.

★ मुलाखतीचे वेळापत्रक मनपाच्या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात येईल.

ठिकाण: मुंबई
दिनांक

सही/-
डॉ. रमेश भारमल
संचालक (वै.शि. व प्र. रु.)